**प्रेस नोट** **दि.२८/०४/२०१९**

## लष्कर पोलीस ठाणे,पुणे शहर
## ४२० मधील आरोपी तात्काळ ताब्यात घेतले बाबत

दि.२६/०४/२०१९ रोजी लष्कर पोलीस स्टेशन, पुणे गुरन २१२/२०१९ भादवि कलम १७०,४०६,४१९,४२०,३४ मधील फिर्यादी महिला नामे मंदिनी प्रमोद भोसले, वय ३२ वर्षे, व्यवसाय- नोकरी, रा. २१८७ न्यु मोदीखाना कॅम्प पुणे. यांनी पोलीस ठाणेस येऊन तक्रारी दिली की, आरोपी नामे सुफीयान रहेमान खान वय- २८ वर्षे रा.२१६/२१७ मंगळवारपेठ, जुना बाजार, पुणे व त्याची साथीदार महिला नामे अर्चना हनुमंत दसवडकर रा. फ्लॅट नं.१०१, शांता निवास, पॉप्युलरनगर, वारजे-माळवाडी, पुणे यांनी संगणमत करून आरोपी क्रमांक १ सुफीयान खान याने स्वतः पोलीस असल्याची बतावणी करून सायबर सेल येथे नोकरी करीत असल्याचे भासवुन फिर्यादी महिलेस प्रथम महिला दिनाच्या निमीत्ताने प्लेझर मोटार सायकल स्कुटर डिसकाऊंट मध्ये खरेदी करून देतो असे सांगुन फिर्यादी महिलेकडुन रक्कम रुपये ४५,०००/- घेतले व गाडी दिली नाही. त्यानंतर पुन्हा तिचा विश्वास संपादन करुन तिच्याकडुन रक्कम रूपये १०,७५०/- घेऊन तुम्हाला पोलीस कोटयात प्लेझर मोटार सायकल स्कुटर खरेदी करून देतो असे म्हणुन एकुण रक्कम रूपये ५५,७५०/- रुपये घेऊन गाडीन देता तिची फसवणुक केली वरुन वर प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री चंद्रकांत भोसले यांनी सदर आरोपीस ताब्यात घेण्याबाबत तपास पथकाचे अधिकारी व कर्मचारी यांना आदेशीत केल्याने त्याप्रमाणे सदर आरोपी नामे सुफीयान रहेमान खान यास ताब्यात घेऊन दाखल गुन्हयात दिनांक २७/०४/२०१९ रोजी ००/०५ वा. अटक करण्यात आलेली असुन आरोपी महिला नामे अर्चना हनुमंत दसवडकर हिस दिनांक २७/०४/२०१९ रोजी ११/०० वा. अटक करण्यात आलेली असुन सदर दोन्ही आरोपीतांना मा. न्यायालया समक्ष हजर केले असता त्यांची दिनांक ३०/०४/२०१९ रोजी पर्यंत पोलीस कस्टडीची रिमांड मिळाली आहे. सदर आरोपीतांनी याप्रमाणे बऱ्याच लोकांना फसवल्याची प्राथमिक माहिती तपासात निष्पन्न होत असुन त्याप्रमाणे सदर आरोपीतांकडे अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक प्रसाद गज्जेवार हे करीत आहेत.

सदरची कामगीरी ही मा.पोलीस उप आयुक्त श्री बच्चन सिंग सो, परि.२ पुणे व मा.सहा.पोलीस आयुक्त डॉ. प्रीती टिपरे मॅडम लष्कर विभाग, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली व वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री चंद्रकांत भोसले सो, व पोलीस निरीक्षक (गुन्हे) माया देवरे यांचे नेतृत्वाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उपनिरिक्षक प्रसाद गज्जेवार व पथकातील, पो.हवा. ३१२५ प्रदिप शितोळे, पो.हवा ५८२६ थिकोळे, पो.शि.७३३० अमोल राऊत, पो.शि.९८१५ पवन भोसले, पो.शि.९८२९ धावडे, पो.शि.९८१८ सागर हुवाळे, पो.शि.८८०५ मुश्ररफ पठाण, पो.शि ९८२३ ओलेकर यांनी केलेली आहे.